विनाअनुदान तत्वावर
~~कायम विनाअनुदान तत्वावर~~

जा.क्र. प्राशि/खाप्राशा/वर्ग तुकडी/मंजूरी/पुणे/०१ २६४०८(१)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक 13 DEC 2001

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे
~~२. शिक्षण प्रमुख,~~
~~महानगरपालिका शिक्षण मंडळ,~~
~~नवी तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.~~
~~३. प्रशासन अधिकारी,~~
~~महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,~~

विषय : मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/~~कायम विनाअनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी नैसर्गिक/~~अतिरिक्त~~ वाढीना/~~अतिरिक्त~~ प्रथम/~~अतिरिक्त वर्ग/तुकडया~~ मंजूर करणेबाबत.

संदर्भ : प्राथमिक शिक्षण संचालक यांचे क्र.खाप्राशा/२०००/तुमा-२/६०७२२/ड-५१२, दिनांक २९.११.२००१

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक/~~अतिरिक्त~~ वाढीना/~~अतिरिक्त~~ प्रथम/~~अतिरिक्त~~ वर्ग/~~तुकडया कायम~~ विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

क्र.	शाळेचे नांव	माध्यम	इयत्ता	वर्ग/तुकडी वाढ नैसर्गिक/अतिरिक्त
१.	२.	३.	४.	५.
१.	शमशुद्दीन इनामदार उर्दू प्राथमिक ~~विद्यालय~~ शाळा सय्यदनगर, पुणे	उर्दू	इ. ५वी, ६वी, व ७वी चा प्रथम वर्ग	नैसर्गिक वाढ.

अटी व शर्ती.

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरविताना शासन निर्णय क्रमांक-पीएलएन-२०००/(२४५५)/प्राशि १, दिनांक ८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणाऱ्या या वर्गांना/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावेळी उपलब्ध करून घेण्याची दक्षता संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.

२. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३. सदर शाळेने वर्ग/तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून घ्याव्यात.

४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.

५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेला अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.

८. तपासणी अंती कुठे जरी अट अथवा शर्त नियमबाह्य निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

ई. शेंडी

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका शमशुद्दीन इनामदार उर्दू प्राथमिक शाळा, सय्यदनगर, जि. पुणे.